संजय कुमार
मुख्य सचिव

अ.शा. पत्र क्र. JJM २०२०/प्र.क्र.११३ /पापु-०७
दिनांक :- १४ ऑक्टोंबर, २०२०

**विषय - जल जीवन मिशन अंतर्गत अंगणवाडी व शाळा यांना पाणी पुरवठा करण्याबाबत १०० दिवसांची मोहिम**

प्रिय,

या संदर्भात सचिव, भारत सरकार यांनी पाठविलेले दिनांक १ ऑक्टोंबर २०२० रोजीचे पत्र पहावे. मा. प्रधान मंत्री यांनी दिनांक २ ऑक्टोंबर २०२० रोजी शाळा व अंगणवाडी यांना १०० टक्के पाणी पुरवठा देण्याबाबत १०० दिवसाची मोहिम जाहीर केली आहे. या संबंधी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

आपल्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये

अ) गावातील प्रत्येक घराला १०० टक्के नळाने पाणी पुरवठा देणे.

ब) गावातील अंगणवाडी यांना पाणी पुरवठा देणे.

क) गावातील शाळांना पाणी पुरवठा देणे.

उपरोक्त बाबत ग्रामपंचायतीचा ठराव घेण्यात यावा व यासाठी लागणारा निधी हा १५ व्या वित्त आयोग व जल जीवन मिशन यामधुन खर्च करण्यात यावा. तसेच ज्या अंगणवाडी व शाळा यांना अजूनही पाणी पुरवठा नाही त्यांची यादी करण्यात यावी व आवश्यकतेप्रमाणे योजना तयार करुन घ्यावी. यासाठी विभागाने घालून दिलेल्या निकषांप्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घ्यावी आणि हे काम जास्तीत जास्त ग्रामपंचायत पातळीवर कसे करता येईल, या दृष्टीने कार्यवाही करावी.

याबाबत आपण स्वत: जाणीवपूर्वक लक्ष देऊन ही उदिष्टे घालून दिलेल्या १०० दिवसात साध्य करुन घ्यावीत.

आपला, स्नेहांकित

(संजय कुमार)

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषद.

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in